# जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

**(महसूल आस्थापना शाखा)**

सिध्देश्वर पेठ, सोलापूर -४१३००१

दुरध्वनी क्र.०२१७-२७३१०११   ईमेल- revbrsol.rfsol-mh@gov.in   फॅक्स क्र. ०२१७- २६२११२०


---

२०१६/क्र.मह/आस्था-१/प्र.क्र.१२९/आर.आर. ४०२ /२०१७   सोलापूर दिनांक २०/०३/२०१७

प्रति,

श्री/श्रीमती------------------------------------

रा.--------------------------------------------

विषय:- तलाठी सरळ सेवा भरती-२०१६
कागदपत्रे/प्रमाणपत्र तपासणीबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, तलाठी सरळ सेवा भरती-२०१६ संदर्भात दिनांक ११/०९/२०१६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती. सदर लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणीसाठी बोलविणेत येणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणेत आलेली असून सदर यादीमध्ये आपले नाव समाविष्ट आहे. त्या संदर्भाने **सोमवार दिनांक २७/०३/२०१७ रोजी सकाळी १०-०० वाजता, सेतू सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर** येथे खालील कागदपत्रांसह आपण उपस्थित रहावे.

(१) लेखी परीक्षेच्या ओळखपत्राची पोहोच, ऑनलाईन अर्जाची प्रत
**खालील कागदपत्रांच्या मुळ प्रती तसेच प्रत्येकी दोन छायांकित साक्षांकित प्रती**
(२) संगणक अर्हता- MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र
(३) शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व कागदपत्रे
(४) वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे
(५) जातीचा मुळ दाखला / मुळ वैधता प्रमाणपत्र
(६) अनुभव असल्यास त्याबाबतचे मुळ प्रमाणपत्र
(७) महिला या समांतर आरक्षणातून निवड झालेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राची मुळ प्रत
(८) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (सोबत नमुना जोडला आहे)
(९) चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र
(१०) अपंग प्रवर्गातील उमेदवारांनी किमान ४०% अपंगत्वाचे विहीत नमुन्यातील जिल्हा शल्य चिकित्सक / वैदयकीय मंडळ यांचे प्रमाणपत्र
(११) वैदयकिय पात्रता प्रमाणपत्र
(१२) अन्य अनुषंगिक कागदपत्रे

मा.जिल्हाधिकारी सो.
यांचे मान्यतेने }

(अजित रेळेकर)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**

**प्रत- एन.आय.सी.सोलापूर/ महाऑनलाईन लि.मुंबई यांचेकडे-**

२/- प्रस्तुत पत्र आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.